GuruAanklan

| GRAND TEST | इयत्ता : १० वी<br>मराठी (CODE - A) | उत्तरपत्रिका |
|---|---|---|

### विभाग १ - गद्य

**प्र. १ (क) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **२०**

**(कृती १): कृष्णाबाईंना याची गंमत व कौतुक वाटे -** **(२)**

(i) मास्तर कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते.

(ii) त्यांची कविता तेरावी चौदावीची मुले अभ्यासत होती.

**(कृती २): एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

(i) मास्तरांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे नाव काय?

माझे विद्‌यापीठ

(ii) मास्तरांचा काव्यसंग्रह कोठे अभ्यासक्रमात लावला?

मास्तरांचा काव्यसंग्रह अनेक विद्‌यापीठात तेरावी चौदावीच्या अभ्यासक्रमात लावला होता.

**(कृती ३): (i) लिंग बदला.** **(१)**

बाई - पुरुष चांगला - चांगली

**(ii) अनेक वचन लिहा.** **(१)**

गंमत - गमती प्रतिक्रिया - प्रतिक्रिया

**(कृती ४): कवी, कविता व कवितासंग्रह याविषयी तुमचे मत मांडा.** **(२)**

कवीच्या भावभावना, विचार या सर्व त्याच्या कवितेत प्रतिबिंबीत होत असतात. कविता ही कवीमनाचा आरसा असते. कविता लिहिताना कवीला समाज जीवनाचे भान ठेवावे लागते. कवीसाठी निसर्ग, समाज, आपल्या चालीरिती अशा अनेक क्षेत्रातील विषय असतात. काही कवी केवळ लहान मुलांसाठी कविता लिहीतात. तर काही कवी सर्व वयोगंटासाठी कविता लिहितात. कवीला कविता करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे बंधन नसते. काही कवींचे काव्यसंग्रह प्रेरणादायी, वास्तवर्शी, मनोरंजनात्मक असतात. निवडक काव्यसंग्रह प्रेरणादायी, वास्तवदर्शी, मनोरंजात्मक असतात. निवडक काव्यसंग्रहांचा समावेश अभ्यासक्रमात केला जातो. त्यामुळेच त्या कवीचा आपल्याला अधिक परिचय होतो.

**(ख) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा. (८)**

**(कृती १): एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)**

(i) तुळशीरामच्या मृत्यूच्या दु:खाची तीव्रता कमी करण्याचा, वेदनेचे आनंदात रुपांतर करण्याचा ध्यास पतिपत्नीला लागला होता.

(ii) पतिपत्नीच्या ध्यासाचा श्वास झाला आणि अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे आनंदवन निर्माण झाले.

**(कृती २): सत्य की असत्य ते लिहा. (२)**

(i) असत्य (ii) सत्य

(iii) असत्य (iv) सत्य

**(कृती ३): अनेकवचन लिहा. (१)**

(i) कपडे (ii) गाडया

**(२) विरुद्धार्थी शब्द लिहा. (१)**

(i) मित्र × शत्रु (ii) सुख × दु:ख

**(कृती ४): 'कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही' या सुवचनावर तुमचे मत लिहा.(२)**

कोणतीही गोष्ट किंवा वस्तु आपल्याला सहज मिळाली तर आपल्याला त्याची किंमत नसते. पण अगदी या उलट कष्टामुळे आपल्याला जी गोष्ट मिळते त्याची आपल्याला किंमत कळते. त्यात आपल्याला समाधान मिळते. जीवनात हेच महत्त्वाचे असते. तसेच एखाद्या व्यक्तीसाठी, वस्तुसाठी आपण आपल्या सुखाचा, वस्तुचा त्याग केला तर त्यात आपल्याला सुख मिळते, समाधान मिळते. आपल्याला जीवनात सुख, समाधान, आनंद हवा असेल तर त्यासाठी कष्ट हवेतच तसेच त्यागाची गरज आहे. आळस आणि हव्यास, लोभ यातून कधीच सुख मिळत नसते. आपले जीवन सुखी समाधानी असावे ही प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी कष्ट आणि वेळ पडल्यास त्याग हे आवश्यक आहेत.

**प्र. १ (ग) पुढील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा. (कोणतेही ४)**

(१) ईश्वर आणि माणूस यांचे नाते कसे असावे?

(२) देव कशाचा भुकेला असतो?

(३) आई तूप-रोटी का खात नाही?

(४) ईश्वराला कोणत्या अवडंबराची गरज नसते?

(५) कोठे देवा-धर्मावर वारेमाप उधळपट्टी योग्य नाही?

(६) देवाला तूप केव्हा गोड लागत नाही?

## विभाग २ - पद्य

**१६**

**प्र. २ (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ८

**(१) संतांना पाहून सेना महाराजांना असे वाटले?**

(i) जिवाला सुख वाटले (ii) आज मला माझे माहेर भेटले

(२) वरील अभंगात कोणत्या सणांचा उल्लेख आला आहे ?

१) दिवाळी　　२) दसरा

**(२) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **२**

(१) संत सेना महाराजांचा थकवा संतांचे चरण पाहिल्यामुळे गेला.

(२) संत ज्ञानेश्वर, संत नामदेव

**(३) खालील पद्य पंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.**

वरील पद्यपंक्ती संतवाणी मधील आजि सोनियाचा दिवस या अभंगातील आहेत. हे अभंग संत सेना महाराज यांनी लिहिलेले आहेत.

संतांचे चरण पाहताच संत सेना महाराजांचा सारा थकवा नाहीसा झाला. त्यांना आजचा दिवस दिवाळी किंवा दसरा असल्यासारखे वाटते. संत आपल्या घरी आल्यामुळे संत सेना महाराजांना खूप आनंद झाला आहे. ते तो आनंद या अभंगातून व्यक्त करतात.

**(४) पर्याय ओळखून रिकाम्या जागी लिहा.** **(१)**

(१) श्री संकलसंतगाथा

(२) खालील पद्यपंक्ती पूर्ण करा. **(१)**

आजि सोनियाचा दिवस <u>दृष्टीं देखिले</u> संतांस.

**प्र. २ (ब) पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(८)**

**कृती (१)** (i) कवीच्या मते पुढील गोष्टी जमीनदोस्त व्हाव्यात.

(१) घरे　　(२) शहरे

(ii) आदर्श घरे आणि शहरे अशी हवीत - **(२)**

१) एकाच आकाराची　　२) एकाच विचाराची

३) एकाच उंचीची　　४) भेदाभेदविरहित

(iii) समतेच्या तुफानात विषमतेचे दगडगोटे **(२)**

(१) उडून जावेत　　२) वितळावेत

**कृती (२)** (१) पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा. **(२)**

सारा निसर्ग <u>बदलावा माणसाला बदलण्यासाठी</u>
<u>आणि माणसाला किंमत यावी</u> माणूस म्हणून

(२) कृती करा

असा प्रलय व्हावा
समतेचं तुफान सुटावं
विषमतेचे दगडगोटे
उडून जावेत अस्मानात

सारा निसर्ग यासाठी बदलावा — (i) माणसाला बदलण्यासाठी; (ii) माणसाला माणूस म्हणून किंमत येण्यासाठी

## विभाग ३ - स्थूलवाचन **४**

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती करा.**

(१) पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोलखोल दऱ्याखोऱ्यामधून व महान नद्यांमधून येणाऱ्या आशीर्वाद स्वरुप पाण्याचे स्मरण ठेवावे. जीवन पाण्याशिवाय अशक्य आहे. पिण्यासाठी एकही थेंब मिळाला नाही तर आपली खूप वाईट अवस्था होईल. म्हणून पाण्याचा एक थेंबही वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी. देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवू. अशी शपथ घेऊया. मग सर्वांना शुध्द पाणी मिळेल. पाण्याचे योग्य नियोजन करा.

(२) १९२० नंतर स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व म. गांधी यांच्याकडे आली. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांच्या साहयाने हा लढा तीव्र बनला. कोल्हापूरात विद्यार्थिदशेतच लेखक राष्ट्रसेवादलात जाऊ लागले होते. तेथे वैचारिक प्रबोधन होत होते. त्यामुळे इंग्रजांची सत्ता घालविण्याची भावना तीव्र झाली. कोल्हापूरात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ जोमाने वाढत होती. लेखकाने त्याच्या काही मित्रांसह मुंबईत धाव घेतली. गांधीजींची पूर्ण स्वतंत्र्याची मागणी व नेहरूंच्या भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषणाने लेखक भारावून गेले आणि शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून देण्यास तयार झाले.

(३) लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाडयांबरोबर जावे लागे. शाहुपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जवाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गुळ 'कोल्हापुरी गूळ' म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही सर्वांना आकर्षित करणारा आहे.

(४) भैरू जादूगाराने संमोहित करताच चिनार हा चिंचेचं झाड व जुई चाफ्याचं झाड झाली.

अंगभर पसरलेल्या फांद्या, त्यावर बसलेले पक्षी, त्यांची घरटी, सावलीत उभे असलेले लोक हे सर्व चिनार झाड बनून पाहत असतो. त्याला तहान लागते तेव्हा तो स्वतःच आपल्या मुळांनी जमिनीत हळूवार हालचाल करुन थोडंस पाणी मिळवतो.

जुई खाली बसलेल्या आजोबांना फुलं टाकून खुश करत होती. संध्याकाळी पक्षी आपल्या घरांकडे येत होते. चिनाऊ व जुई यांच्या मनात घरचे विचार येतात. आपण घरी न गेल्यामुळे आईबाबांची धावपळ सुरु झाली असेल. आपल्या या वागण्याने त्यांना त्रास होईल. हा अनुभव, चिनार व जुईला आला.

## विभाग ४ - व्याकरण **१०**

**प्र. ४ अ) खालील रिकाम्या जागा भरुन कोष्टक पूर्ण करा.** **(२)**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १) | पंचवटी | पाच वाटिकांचा समूह | द्विगू समास |
| २) | पापपुण्य | पाप किंवा पुण्य | वैकल्पिक समास द्वंद्व |

**ब) सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.** **(२)**

१) किती छान आहे तुमचं घर!

२) काय विजयी होऊन येणार ना?

**क) शब्द संपत्ती - गटात न बसणारा शब्द लिहा.** **(१)**

१) मोर, बगळा, कबूतर, मांजर, घार - मांजर

२) पेन, पेन्सिल, चाकू, वही, पुस्तक -चाकू

**ड) विरामचिन्हांचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

"खरा घनचक्कर तर मीच आहे".

**इ) खालील वाक्य लेखन नियमानुसार लिहा.** **(१)**

आम्ही शाळेत वेळेवर गेलो.

**फ) वाक्यप्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.** **(२)**

| | | |
|---|---|---|
| १) | स्तंभित होणे | आश्चर्यचकित होणे |
| २) | विपर्यास करणे | चुकीचा अर्थ घेणे |
| ३) | डोळा लागणे | झोप लागण |
| ४) | मन दुखावणे | वाईट वाटणे |

**ग) पुढील शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** **(२)**

व्रत —— वसा, उपवास

## विभाग ५ - उपयोजित लेखन **३०**

**प्र. ५ (अ) पुढीलपैकी कोणत्याही एका पत्राचा नमुना तयार करा.** **(५)**

पत्राच्या उजव्या बाजूस कोपऱ्यात पाठवण्याचा पत्ता व दिनांक मायना - वयोमानानुसार नमस्कार/आशीर्वाद

व्यावसायिक पत्रात ज्याला पत्र पाठवतो त्याचा पत्ता

पत्राचा विषय

कार्यालयीन पत्रांत महत्त्वाचा पदांचा उल्लेख असावा.

पत्राच्या मध्य भागात महत्त्वाचा मजकूर पण थोडक्यात.

व्यक्तीचे पद व प्रतिष्ठा लक्षात घेऊन योग्य भाषा असावी.

औपचारिक पत्रात अधिकाऱ्याविषयी विश्वास व्यक्त करुन लवकरात लवकर कार्यवाहीची विनंती करावी.

पत्रामध्ये या सर्व मुद्यांच्या आधारे गुणांकन केले जाते. पत्राच्या शेवटी लिफाफा तयार करून त्यावर पत्र लिहिणारा व वाचणारा (from-to) असे दोघांचे पत्रे लिहावेत.

**(ब) खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा.** **(५)**

कथा लेखनात पुढील गोष्टींचा विचार करावा.

गोष्टीची रुपरेषा - सुरुवात - भाषा व विस्तार कथेचा शेवट. कथेतून मिळणारी शिकवण - कथेचे ताप्तर्य.

या सर्वांचा विचार करुन गुणांकन केले जाते.

**(क) उतारा वाचून एकेक मार्कांचे पाच प्रश्न तयार करा** **(५)**

(१) निसर्ग कसा आहे?

(२) आपण निसर्गाकडून खूप गोष्टी केव्हा शिकतो?

(३) 'पुढे जा, पुढे जात रहा' असा संदेश कोण देतात?

(४) आपल्या कृपेची बरसात करणारे मेघ कोणता कानमंत्र देतात ?

(५) या उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

**प्र. ६** **(अ-१) जाहिरात लेखन** - यामध्ये आकर्षकता हा मुद्दा महत्त्वाचा असतो. तसेच जाहिरातीत जी माहिती द्यायची महत्त्वाची पण थोडक्यात दिली गेली पाहिजे. ही जाहिरात जर व्याख्यान, प्रदर्शन, कार्यालयाचे असेल तेथे दिनांक - स्थळ व वेळ याचा उल्लेख आवश्यक आहे. खाद्यपदार्थ वा अन्य वस्तुंची जाहिरात असेल तर त्याचे गुणधर्म, फायदे थोडक्यात सांगितले पाहिजेत.

या सर्व मुद्दयांचा विचार करून गुणांकन होते.

**(अ-२)** कोणत्याही प्रसंगाचा, कार्यक्रमाचा, शिबिराचा वृत्तांत लिहिताना तो भूतकाळातच लिहितात. याचे भान ठेवावे. तेथे स्थळ, वेळ, दिनांक आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तेथील आयोजक, प्रमुख पाहुणे यांची माहिती असायला हवी. वृत्तांत लिहिताना घडलेल्या घटनांचा क्रम योग्य असावा. त्या कार्यक्रमास लोकांचा/प्रेक्षकांचा प्रतिसाद कसा मिळाला याची नोंद असावी.

**(अ-३) सारांश लेखन** - मूळ उताऱ्यातील महत्त्वाचा विचार सारांशात यायला हवा. उदाहरणे अपेक्षित नाहीत. अनावश्यक बाबी टाळाव्यात. आपल्या शब्दात लिहिलेला असावा. सारांश मूळ उताऱ्याचा १/३ असावा. सर्व मुद्दयांचा विचानासुरार गुणांकन होते

**(ब) निबंध - लेखन**

या प्रश्नात ३/४ विषय दिले जातात. त्यापैकी कोणत्याही एका विषयाची विचारपूर्वक निवड करावी. यामध्ये वर्णनात्म, काल्पनिक, आत्मकथनात्मक असे विषय असतात. त्या प्रकारानुसार आपले लेखन असावे.

निबंधाची सुरुवात आकर्षक असावी. काव्यपंक्ती, सुविचार, थोरांचे बोल अशी सुरुवात केल्यास उत्तम. विषयाच्या मुद्दयांची कच्ची रुपरेषा करून घ्यावी. त्यामुळे कोणताही मुद्दा राहणार नाही.

मध्यभाग दोन परिच्छेदाचा असावा. त्यात विषयाची मांडणी उदाहरणे देऊन केली जावी. सविस्तर विषय मांडला जावा. साधक-बाधक चर्चा व्हावी.

निबंधाचा अंत (शेवट) परिणामकारक करावा. तो प्रभावशाली ठरतो. त्यातून नकळत त्या विषयाचे तात्पर्य किंवा शिकवण यावी.

◆◆◆◆